राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ पुणे यांच्यासमोरील
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नविन प्रशासकीय इमारत,
विधान भवन समोर,पुणे-४११००१

श्री.कुंदन नेताजी सुतार
मु.पो.चिंचनेर वंदन, ता.जि.सातारा

<u>सुनावणी दिनांक-२५/०८/२०२५</u>

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये खालील प्राधिकरणांकडे एकूण १७ द्वितीय अपिले (लगतच्या यादीनुसार) दाखल केलेली आहेत.

| अ.क्र. | प्राधिकरणाचे नाव | अपिल संख्या |
|---|---|---|
| १ | शिक्षण विभाग माध्यमिक, जिल्हा परिषद सातारा | १७ |

प्रस्तुतची व्दितीय अपीले दाखल करतांना प्रयोजनामध्ये,जाणूनबुजून माहिती दिली नाही, माहिती मिळाली नाही, ,प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली परंतु आदेश पारित केला नाही,असे प्रयोजन नमूद केलेली आहेत. सदर व्दितीय अपीलांची सुनावणी दि.२५/०८/२०२५ रोजी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व संबंधित प्राधिकरणांचे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान तसेच दि.२५.०८.२०२५ रोजीच्या लेखी निवेदनामध्ये असे अवगत केले की, मी सादर केलेल्या एकूण प्रकरणांपैकी ४ प्रकरणामध्ये माहिती मिळाली आहे. इतर प्रकरणांमध्ये माहिती मिळाली नाही. मी जिल्हा परिषद सातारा कडे एकुण १८ अपिल दाखल केले होते. त्यामध्ये माझ्या विनंतीनुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी एकत्र आदेश पारित केले होते. सदर आदेशाची अंमलबजावणी जन माहिती अधिकारी यांनी केली नाही. मा.शिक्षणाधिकारी ,माध्यमिक शिक्षण विभाग सातारा जि.प.सातारा यांचे कार्यालय हे मुद्दाम करत असलेल्या चालढकल प्रवृत्तीस मी कंटाळलो असून. उक्त प्रकरणी मोठ्या आर्थिक संकटास सामोरे जावे लागत आहे. तरी मला उर्वरीत प्रकरणांमध्ये माहिती देणेचा आदेश पारित करावा.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकुण १८ माहिती अर्ज कार्यालयास सादर केले होते. मागणी केलेली माहिती ही अत्यंत विस्तृत

स्वरुपाची असल्यामुळे दि.१९.१२.२०२३ च्या पत्राने अपिलार्थी यांना अवलोकनाकरीता कार्यालयीन वेळेत उपस्थित राहणेबाबत कळविले आहे. अपिलार्थी यांना ४ प्रकरणामध्ये माहिती देणेची कार्यवाही केली आहे तसेच इतर प्रकरणांची माहिती सोबत आणली असून ती देणेची कार्यवाही करणेत येईल.

उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांचे उपलब्ध एकूण १७ अपिलापैकी अपिलार्थी यांना ४ प्रकरणामध्ये माहिती मिळालेचे सुनावणी दरम्यान सांगितले आहे. जन माहिती अधिकारी यांनी उर्वरीत १३ प्रकरणांपैकी ६ प्रकरणांची माहिती सुनावणी दरम्यान दिली व अपिलार्थी यांनी ती मान्य केली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेली, तसेच यापूर्वी दिलेली माहिती वगळून उर्वरीत ७ प्रकरणांची माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जा.क्र.- ९६८३/२०२५ दिनांक : २७/१०/२०२५

| अ.क्र. | अपिल क्रमांक | अपिल वर्ष | जिल्हा | अपिलार्थीचे नाव | जन माहिती अधिकारी पदनाम,जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय | प्रथम अपिलीय अधिकारी,प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५७९ | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | १५८० | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा - ४१५००१ |
| ३ | १५८१ | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा - ४१५००१ |
| ४ | १५८२ | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा - ४१५००१ |
| ५ | १५८३ | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा - ४१५००१ |
| ६ | १५८५ | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा - ४१५००१ |
| ७ | १५८६ | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा - ४१५००१ |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | १५८७ | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ |
| ९ | १५८८ | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ |
| १० | १५८९ | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ |
| ११ | १५९० | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ |
| १२ | १५९१ | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ |
| १३ | १५९२ | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १४ | १५९३ | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा - ४१५००१ |
| १५ | १५९४ | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा - ४१५००१ |
| १६ | १६०८ | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा - ४१५००१ |
| १७ | १६०९ | २०२४ | सातारा | कुंदन नेताजी सुतार | कनिष्ठ प्रशासन अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा -४१५००१ | प्रथम अपिलीय अधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा - ४१५००१ |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ